अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवाकाळ बादशहा

# यंदाच्या निवडणुकीत पैशांची जबरदस्त धुळवड

होळीच्या निमित्ताने राजकीय धुळवडीलाही जोर आला आहे. निवडणुका म्हटल्यानंतर आरोप-प्रत्यारोप तर होतातच. परंतु यावेळच्या निवडणुकीत राजकीय पक्षांच्या अर्थकारणाची सर्वात मोठी धुळवड होईल असे दिसते. विशेषतः काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टी हे दोन्ही पक्ष तितक्याच जिद्दीने आमने सामने ठाकले आहेत. काँग्रेसला पराभवाच्या धास्तीने तर भारतीय जनता पार्टीला अतिमहत्त्वाकांक्षेच्या लोभाने पछाडले आहे. आपला पराभव होऊ नये यासाठी काँग्रेस पक्ष निवडणुकीत पैसा खर्च करताना अजिबात हात आखडता घेण्याच्या मनस्थितीत नाही. तर भारतीय जनता पार्टीला यावेळची निवडणूक म्हणजे विजयाची सुवर्णसंधी वाटते आहे ही संधी पुन्हा येईल की नाही, याची खात्री वाटत नसल्यामुळे या पक्षानेही निवडणुकीच्या प्रचारात पैसे ओतण्यासाठी कुठेही माघार घ्यायची नाही अशीच तयारी केलेली दिसून येते. जाहिरात, प्रचार सभांवरचा खर्च, इलेक्ट्रॉनिक तंत्राचा वापर, जागोजागी पैसे देऊन कार्यकर्ते भाड्याने देण्याचा प्रकार, वाहनांचे ताफे आणि बड्या नेत्यांसाठी विमान, हेलिकॉप्टरचे जथ्थे असा सगळा प्रचाराचा चारी बाजूंनी धडाका लावायला सुरुवात झालेली आहे. या सगळ्या खर्चाचा अंदाजही काही संस्थांकडून घेतला जात आहे. ताज्या आकडेवारीप्रमाणे निवडणूक आयोगातर्फे केला जाणारा खर्च आणि राजकीय पक्षांकडून ओतला जाणारा पैसा हा सगळा खर्च तब्बल एक लाख कोटींपर्यंत जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. निवडणूक आयोगाचाच खर्च दोन हजार कोटींचा आहे. तर राजकीय पक्षांनी आपापले टार्गेट ठरवताना त्याचे राज्यनिहाय अंदाज बांधले आहेत. संपूर्ण देशभरामध्ये तीस राज्ये आहेत. या तीसही राज्यांमध्ये प्रत्येक राजकीय पक्ष सरासरी तीन हजार कोटींचा खर्च करेल, अशी शक्यता व्यक्त होत आहे म्हणून यंदाची निवडणूक ही सर्वाधिक खर्चिक आणि अर्थकारणाची धुळधाण करणारी ठरेल, असे म्हणायला काहीच हरकत नाही. साधारणपणे निवडणुकांची घोषणा केल्यानंतर आचारसंहिता लागू होते. तेव्हापासून उमेदवार किंवा राजकीय पक्षांकडून केला जाणारा खर्च याचा अंदाज यायला लागतो. परंतु काँग्रेस आणि भारतीय जनता पार्टीने गेल्या सहा महिन्यांपासूनच आपली तयारी सुरू केली आणि या तयारीवर दोन्ही पक्षांकडून साधारणपणे पाच पाच हजार कोटींचे खर्च झाल्याचे अंदाज व्यक्त होत आहेत.

## करोडोंची उलाढाल

सर्वात महत्त्वाचे म्हणजे निवडणूक आयोगाने प्रत्येक उमेदवाराच्या खर्चाची मर्यादा सत्तर लाखांपर्यंत नेली आहे. यावरून पाचशे वीस उमेदवार आणि प्रत्येकी सत्तर लाखांचा खर्च असा हिशेब मांडला तर हाच खर्च चारशे कोटींच्या वर जातो. प्रत्येक उमेदवार त्याला निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या खर्चापेक्षा दुप्पट ते तिप्पट खर्च करतो. गेल्याच वर्षी महाराष्ट्रातल्या एका भाजपाच्या वरिष्ठ नेत्याने आपल्याला खासदार होण्यासाठी आठ कोटी खर्च करावे लागले, असा गौप्यस्फोट केला होता. याचा अर्थ सरासरी पाच ते दहा कोटी खर्च करण्याची तयारी प्रत्येक लोकसभा उमेदवार करतो यात काही शंका नाही. भारतासारख्या विकसनशील देशात निवडणुकीसारख्या प्रकारावरून इतका प्रचंड पैसा खर्च व्हावा हे खरे तर अजिबात परवडणारे नाही. यासाठी एकूणच भारतातल्या निवडणूक पध्दतीचा पुनर्विचार करण्याची वेळ आली आहे. विशेषतः प्रत्येक राजकीय पक्ष जो पाण्यासारखा पैसा खर्च करतो. तो कसा वाचवता येईल, याचा विचार झाला पाहिजे. काही देशांमध्ये उमेदवाराला लागणारा निवडणूक खर्च सरकारकडून दिला जातो. त्यामुळे बऱ्याच प्रमाणावर पैसा वाचतो. आज प्रत्येक राजकीय पक्ष जिंकण्याच्या ईर्षेने जो प्रचंड पैसा ओतत असतो. त्यामध्ये बेहिशेबी किंवा काळ्या पैशाचा जास्त प्रभाव दिसून येतो. त्याचा अर्थ असा होतो की, निवडणूक ही काळ्या पैशाला चालना किंवा प्रोत्साहन देणारे निमित्त आहे. त्याचा काही ठराविक लोक बरोबर फायदा घेतात आणि काळ्या पैशाला रीतसर चलनामध्ये घुसवण्याचा प्रयत्न करतात. स्वत:कडे असलेला काळा पैसा अशा निवडणुकांमध्ये आपोआपच पांढरा होतो. म्हणूनच प्रामुख्याने लोकसभा निवडणुकीचा हा सगळा सट्टाबाजार पाहिला तो तातडीने थांबवण्याची आवश्यकता वाटू लागते. निवडणुका म्हटल्यानंतर खर्च हा होणारच यात काही शंका नाही. परंतु तो किती व्हावा यालाही काही सीमा आहे. जर याच गतीने प्रत्येक लोकसभा निवडणुकीतला खर्च वाढत राहिला. तर लोकशाहीच्या नावाखाली निवडणूक म्हणजे पैसेवाल्यांचा जुगाराचा खेळ ठरत जाईल. त्यात सामान्य माणसाची कोणतीच भूमिका शिल्लक राहणार नाही.

## निवडणूक म्हणजे नुसतेच मतदान नाही

अगदी पहिल्या लोकसभा निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाने केवळ दहा कोटी खर्च केल्याचे आकडेवारीवरून दिसते. आज सोळाव्या लोकसभा निवडणुकीसाठी निवडणूक आयोगाला दोन हजार कोटी रुपयाचा खर्च येणार आहे. दहा कोटी ते दोन हजार कोटी ही वाढ पाहिली तर प्रत्येक निवडणूक ही कशी अर्थकारणाचे नवे समीकरण मांडणारी आहे हे लक्षात येते. गेल्या साठ वर्षांमध्ये महागाई वाढली. पण तीसुध्दा सहाशे टक्क्यांनी वाढली हेदेखील निवडणूक आयोगाच्या वाढत्या खर्चावरून दिसून येते. ज्या देशातला सामान्य नागरिक आज महागाईने अक्षरशः भरडून निघतो आहे. ज्या देशातला सामान्य शेतमजूर रोज फक्त बत्तीस रुपये कमावून थकतो आहे. त्या देशात साधारणपणे पंचेचाळीस दिवसांच्या या निवडणूक हंगामात जर एक लाख कोटींचा चुराडा होत असेल तर भारत हा आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे, असे कोण म्हणेल किंवा निवडणूक हंगामामध्ये रोज सरासरी पाचशे कोटींचा खर्च होत राहिला, तर या देशातली चाळीस टक्के जनता दारिद्र्यरेषेखाली आहे असे म्हणणेदेखील धाडसाचे ठरते. देशातील सध्याच्या परिस्थितीचा किंवा सामान्य माणसाच्या जीवन संघर्षाचा विचार केला तर या निवडणूक खर्चाबाबत आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. म्हणूनच निवडणूक म्हणजे केवळ प्रचार आणि लोकांसाठी मतदान एवढ्यापुरताच राहिलेला नाही. त्यानिमित्ताने विविध प्रकारच्या वस्तूंची खरेदी-विक्री ते अनेक लोकांना रोजगाराची प्राप्ती अशी सगळी उलाढाल घडत असते. त्यातूनच निवडणुकीत होणारा खर्च धक्कादायक वाटू लागतो. कारण यातले निम्म्याच्यापेक्षा जास्त पैसे हे पुन्हा मूठभर लोकांच्याच तिजोरीत जात असतात.